

**उजळाईवाडी : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.**

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**उजळाईवाडी :** शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत डॉ. पवार यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अतिथीगृह परिसरातील तसेच डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथील डॉ. पवार यांचा अर्धपुतळा येथेही अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. किसनराव कुराडे, प्रा. टी. के. सरगर, डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. एम. एन. निंबाळकर, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. एस. जी. नाईक, डॉ. सी. पी. पोवार, बाबा सावंत, डॉ. खंदारे, डॉ. जगताप, सुरेश पाटील आदी उपस्थित होते.

# नवीन वर्षात विद्यापीठ परिसर नागरिकांसाठी खुला

- सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत फिरण्यास मुदत
- कोरोनाचे नियम पाळणे बंधनकारक

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्च महिन्यापासून विद्यापीठ परिसरात नागरिकांना फिरण्यास मनाई करण्यात आली होती. उद्याने खुली या शासनाच्या निर्णयानंतरही विद्यापीठ परिसरात फिरण्यास मनाई केली जात होती. त्यामुळे विद्यापीठ परिसर फिरण्यास खुला करावा, अशी कोल्हापूर नागरी कृती समितीने मागणी केल्यानंतर सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत विद्यापीठ परिसर नागरिकांना फिरण्यासाठी खुला करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांनी कोरोनाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासनाच्या सूचनांच्या आधिन राहून शिवाजी विद्यापीठ परिसर सर्वसामान्य नागरिकांना फिरण्यासाठी खुला करण्यात आला आहे. परंतू कोरोना संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी शासन नियमांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. नवीन वर्षात शहरातील नागरिकांसाठी ही गोड बातमी असून फिरायला जाणाऱ्या नागरिकांना स्वच्छ हवा, भरपूर ऑक्सीजन मिळणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे करवीरवासियांकडून स्वागत केले जात आहे.

# विद्यापीठ परिसर सकाळी ६ ते ९ खुला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोविड-१९ च्या साथीमुळे दि. १५ मार्च २०२० रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यापीठ परिसर सकाळी व संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांसाठी बंद करण्यात आला होता, परंतु सध्या विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांच्या आदेश व मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठ परिसर सकाळी ६ ते ९ या वेळेत खुला केल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. विद्यापीठात फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

## » अवतीभवती

# विद्यापीठ परिसर नागरिकांसाठी खुला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा परिसर सकाळी सहा ते रात्री नऊपर्यंत सर्वसामान्य नागरिकांना खुला केला आहे. त्याबाबतचे पत्रक विद्यापीठातर्फे प्रसिद्धीस दिले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, शासन व जिल्हा प्रशासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. थर्मल स्क्रीनिंग, पूर्ण वेळ मास्क, सामाजिक अंतर व सॅनिटायझरचा वापर बंधनकारक असल्याचे कळविले आहे.

# विद्यापीठ परिसर तीन तास खुला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सामान्य नागरिकांसाठी शिवाजी विद्यापीठाचा परिसर आज, शुक्रवारपासून रोज सकाळी सहा ते नऊ या वेळेत खुला राहणार आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयास अधिन राहून विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय गुरुवारी घेतला आहे.

विद्यापीठाचा परिसर सामान्य नागरिकांना एक जानेवारीपासून मॉर्निंग वॉकसाठी खुला करा, अन्यथा जनआंदोलन करण्याचा इशारा कोल्हापूर शहर व जिल्हा नागरी कृती समितीने मंगळवारी दिला होता. त्यानंतर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन विद्यापीठ परिसर सर्वसामान्यांना खुला केला जाणार आहे.

# ...हा कोल्हापूरच्या फुफ्फुसांची देखभाल करणाऱ्या श्रमिकांचा सन्मान

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : पुष्प स्पर्धेत विद्यापीठाच्या उद्यानांना विजेतपद

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोल्हापूरचा गार्डन क्लब व राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५० व्या पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या फुलांना व उद्यानांना सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त होणे म्हणजे कोल्हापूर शहराच्या फुंफ्फुसाची देखभाल करणाऱ्या श्रमिकांचाच सन्मान आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

येथील गार्डन क्लब आणि राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुवर्णमहोत्सवी पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा उद्यान विभाग ४० गटांत सहभागी झाला. त्यापैकी ३० गटांत यश मिळवले. १२ गटांत प्रथम, १२ गटांत द्वितीय व ६ गटांत तृतीय क्रमांक पटकावून स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. यानिमित्त उद्यान विभागाच्या सहकाऱ्यांसाठी कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत चहापानाचे आयोजन केले होते, यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा परिसर आणि येथील उद्याने नेत्रसुखद तर आहेतच, पण कोल्हापूर शहराचे फुफ्फुस म्हणून या परिसराकडे पाहिले जाते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, पूर्वी पाण्याच्या दुर्भीक्ष्यामुळे इच्छा असूनही उद्यानाच्या देखभालीत अडचणी येत असत. आता पाण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसर स्वयंपूर्ण झाल्यामुळे उद्यान विभागाला पाण्याची योग्य तऱ्हेने उपलब्धता होत आहे.

यावेळी उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अभियांत्रिकी विभागाचे मेस्त्री गणपती मस्ती, उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव, हेडमाळी संभाजी कांबळे, हेडमाळी संजय सोनुले, माळी सुरेश वागवेकर उपस्थित होते.